तरुण भारत शनिवार, २८ मार्च २०१५

# पर्यावरण संवर्धनासाठी चळवळ उभी राहावी

## खासदार विनायक राऊत यांचे प्रतिपादन : दोडामार्गात 'पर्यावरण आणि विकास'वर चर्चासत्र




दोडामार्ग : 'पश्चिम घाट-जागतिक वारसा, पर्यावरण आणि विकास' चर्चासत्रात बोलताना खासदार विनायक राऊत. बाजूला अन्य मान्यवर.

वार्ताहर
दोडामार्ग

माझ्या बालपणातले कोकण आणि सध्याचे कोकण पाहिले की दुःख होते. अनेक विनाशकारी प्रकल्पांमुळे कोकणचे सौंदर्य, पर्यावरण ऱ्हास होत आहे. पर्यावरण जतन केले तरच आपण चांगले जीवन जगू शकतो. पर्यावरण संवर्धनासाठी केवळ चर्चासत्रांचे आयोजन पुरेसे नसून त्यासाठी चळवळ उभी राहिली पाहिजे, असे प्रतिपादन खासदार विनायक राऊत यांनी केले.

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात भारतीय सामाजिक शास्त्रे अनुसंधान परिषद मुंबई पुरस्कृत 'पश्चिम घाट-जागतिक वारसा, पर्यावरण आणि विकास' या विषयावरील दोन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन झाले. यावेळी राऊत बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवनिर्माण शिक्षण संस्थेचे चेअरमन अभिजीत हेगशेटये होते. या चर्चासत्रात राज्यासह केरळ, कर्नाटक, गोवा येथील पर्यावरण तज्ज्ञ, अभ्यासक, पर्यावरणप्रेमी, विद्यार्थी सहभागी आहेत.

राऊत पुढे म्हणाले की, शासनकर्त्यांची भूमिका ही कुटुंब प्रमुखाची असली पाहिजे. परंतु, दुर्दैवाने तसे घडताना दिसत नाही. कोकणातले जीवन निसर्गावरच अवलंबून आहे. इकोसेन्सिटिव्ह, मोरोटोरियम मधील सत्य लोकांना समजावून सांगितले पाहिजे.

### पर्यावरणाचा समतोल राखा!

हेगशेटये म्हणाले, निसर्गाचा समतोल तुटत चालला आहे. मानवी जीवनाशी निसर्ग निगडीत आहे. निसर्गावर आधारित अनेक रोजगार उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल साधून उपलब्ध साधनांचा वापर करून रोजगार निर्मिती करावी, असे ते म्हणाले.

संस्था सदस्य भाई परमेकर यांच्या हस्ते राऊत यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, प्रा. डॉ. राजेंद्र केरकर, डॉ. हेमंत पेडणेकर, डॉ. एस. ए. ठाकुर, भाई परमेकर, बाबुराव धुरी, सूचन कोरगावकर, विवेकानंद नाईक उपस्थित होते. प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, सूत्रसंचालन प्रा. डॉ. पी. डी. गाथाडे, आभार एस. एन. खडपकर यांनी मानले.

### डॉ. पेडणेकरांचे बीजभाषण

चर्चासत्राचे बीजभाषण प्राचार्य डॉ. हेमंत पेडणेकर यांनी केले. पहिल्या सत्रात पर्यावरण तज्ज्ञ प्रा. राजेंद्र केरकर यांनी 'सांस्कृतिक पर्यावरण', तर दुसऱ्या सत्रात केरळचे प्रा. व्ही. सनलकुमार यांनी 'पश्चिम घाट सांस्कृतिक वारसांचा शोध' वर व्याख्यान दिले. चर्चासत्रात अनेकांनी शोधनिबंध सादर केले.

**पर्यावरणासाठी...!**

- गाडगीळ समितीचा अहवाल पर्यावरणाच्या भवितव्याचा!
- पर्यावरणासाठी चांगल्या गोष्टी स्वीकारणे आवश्यक!
- निसर्गावर आधारित रोजगार निर्मिती हवी!